<u>जाहिरात</u>

# सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाअंतर्गत पुणे प्रशासन विभाग
## अनुसूचित जमाती प्रवर्गाची विशेष भरती मोहिम सन २०१९

माननीय सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दिनांक ०६ जुलै २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील क्रमांक बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब दि.२१ डिसेंबर २०१९ रोजीचे शासन निर्णयान्वये निर्देश देण्यात आले असून, अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली पदे भरण्यासाठी विशेष मोहिम राबवून अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्रधारक उमेदवारांमधून सेवाप्रवेश नियमांनुसार विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन पदे भरण्याची कार्यवाही करावी असे त्याअन्वये सूचित करण्यात आले आहे.

त्यानुसार विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था (प्रशासन), पुणे विभाग,पुणे यांचे विभागीय आस्थापनेवरील गट-क (वर्ग-३) मधील कनिष्ठ लिपिक संवर्गातील अनुसूचित जमातीचे १ पदाकरिता पात्र जात वैधता प्रमाणपत्रधारक उमेदवारांकडून विहित नमुन्यात आणि फक्त ऑफलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. सदरचे अर्ज **दि.२९ जानेवारी २०२० रोजी सकाळी १० वाजल्यापासून ते ४ फेब्रुवारी २०२० रोजी सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,पुणे विभाग,पुणे, साखर संकुल, शिवाजीनगर,पुणे ४११००५ यांचे कार्यालयात स्वीकारण्यात येतील.**

<u>जाहिरातीसाठी द्यावयाची पदे</u>

| अ.क्र. | पदाचे नांव | प्रवर्ग | पदसंख्या | पदाची वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपिक | अनुसूचित जमाती | १ | वेतन स्तर एस ६ : १९९००-६३२०० |

सदर पदासाठी समांतर आरक्षण उपलब्ध नाही.

**शैक्षणिक अर्हता :** वरील पदाकरिता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता उमेदवारांनी जाहिरातीचे दिनांकास धारण केलेली असणे आवश्यक आहे.

१) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.
२) टंकलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा इंग्रजी टंकलेखन ४० शब्द प्रती मिनिट किंवा मराठी टंकलेखन ३० शब्द प्रति मिनिट परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.

**टीप १ :** प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, स्वातंत्र्यसैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी व पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी यांपैकी कोणत्याही घटकांतील उमेदवारांची कनिष्ठ लिपिक पदावर नियुक्ती झाल्यास त्यांना टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून ६ महिने इतक्या कालावधीची मुदत देण्यात येईल.

**टीप २:** माजी सैनिक उमेदवारांची कनिष्ठ लिपिक पदी नियुक्ती झाल्यास त्यांनी नियुक्तीच्या तारखेपासून ११ महिन्यांचे आत वर नमूद केलेली टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण होऊन तसे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

**<u>२. वयोमर्यादा - (जाहिरातीचे दिनांकास)</u>**

१. उमेदवाराचे वय जाहिरातीचे दिनांकास १९ वर्षांपेक्षा कमी व ४३ वर्षांपेक्षा जास्त नसावे.
२. अपंग उमेदवारांसाठी जाहिरातीचे दिनांकास उच्चतम वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षे राहील.
३. स्वातंत्रसैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी या घटकातील खुल्या व मागासवर्गीय उमेदवारांसाठी सरसकट उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील.

४. सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक २७.१०.२००९ च्या शासन निर्णयानुसार सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेंतर्गत ३ वर्षे अंशकालीन काम केलेल्या उमेदवारांना उच्चतम वयोमर्यादा ४६ वर्षे राहिल.

५. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दि. १०.१०.८० , १६/०४/१९८१ व दि.५.१०.८९ नुसार वयातील सूट या मुद्यात नमूद तरतुदीनुसार व सामान्य प्रशासन विभाग शुद्धिपत्रक क्र.मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ दि.२०/०८/२०१० नुसार माजी सैनिकांची ६ महिन्यांपेक्षा कमी नाही इतक्या कालावधीची सेवा केंद्र शासनाच्या सशस्त्र दलात व्हावयास हवी अशा सैनिकांच्या बाबतीत त्यांच्या सशस्त्र दलात झालेल्या सलग सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी विहित वयोमर्यादेत सूट देण्यात येईल आणि विकलांग (disabled) माजी सैनिकांचे बाबतीत वयोमर्यादेत ४५ वर्षापर्यंत सूट देण्यात येईल.

**<u>विशेष सूचना :</u>**

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रशासन-२०००/प्र.क्र.५/२००१/३२ दिनांक २०.०७.२००२ व आनुषंगिक सुधारित शासन निर्णयान्वये उपरोक्त पदांकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संगणक हाताळणी / वापराबाबतचे खाली नमूद केलेले प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षांच्या आंत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त होईल.

१. D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा ,

२) महाराष्ट्र राज्य उच्च तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

**<u>३ . समान सूचना :</u>**

१. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा.(वास्तव्याचे[डोमिसाईल] प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक). शासन निर्णय म.क.सी/१००७/प्र.क्र.३६/का३४/दि.१०/०७/२००८ अन्वये महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गांवातील मराठी भाषिक उमेदवारांना अर्ज करता येईल.(ते मराठी भाषिक असणे आवश्यक आहे तसेच सदर गांवात १५ वर्षे वास्तव्यास असलेबाबतचा सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुन्यातील दाखला जोडणे अनिवार्य राहील.) मागास प्रवर्गातील आरक्षण हे महाराष्ट्र राज्याच्या अधिवासी उमेदवारापुरते मर्यादित राहील.

२. उमेदवारांनी अर्जासोबत सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत व जात वैधता प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत जोडणे बंधनकारक आहे. जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय नेमणुकीचे आदेश दिले जाणार नाही.

३. उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्जावर विहित ठिकाणी अलिकडील काळातील काढलेला एक पासपोर्ट साईज फोटो लावावा व फोटोखाली दर्शविलेल्या योग्य ठिकाणी स्वाक्षरी करावी.

४. सदर पदासाठी उमेदवारांनी **रुपये १५०/- (रुपये एकशे पन्नास फक्त)** परीक्षा शुल्क केवळ डिमांड ड्राफ्टद्वारे भरावयाचे आहे. विहित परीक्षा शुल्क कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेचा व पुणे येथे देय असलेला रेखांकित डिमांड ड्राफट (धनाकर्ष) हा सदस्य सचिव तथा विभागीय उपनिबंधक,सहकारी संस्था,पुणे विभाग,पुणे यांचे नांवे काढण्यात यावा. डी.डी.च्या मागे अर्जदाराने संपूर्ण नांव व पत्ता लिहावा. परिक्षा शुल्क हे ना परतावा राहील. (माजी सैनिकांना परिक्षा शुल्क लागू नाही) अर्जासोबत परिक्षा शुल्क डिमांड ड्राफट न जोडलेस अर्ज अपात्र केला जाईल.

माजी सैनिकांना अर्जासोबत परिक्षा शुल्क भरण्याची अट लागू नाही. मात्र त्यासाठी त्यांनी सैनिकी सेवेचा पदावधी पूर्ण केल्याचे कार्यमुक्त पत्राची साक्षांकित प्रत सोबत सादर करणे आवश्यक राहील.

सदरचा धनाकर्ष व अर्ज विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,पुणे विभाग,पुणे, साखर संकुल, शिवाजीनगर,पुणे ४११००५ येथे प्रत्यक्ष/पोस्टाने दि. ०४/०२/२०२० रोजी सायंकाळी ५.४५ पर्यंत सादर करावा. सदर तारखेनंतर आणि वेळेनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

५. पोस्टाची दिरंगाई अथवा इतर अन्य कोणत्याही कारणामुळे विहित मुदतीनंतर प्रापत झालेल्या अर्जांचा विचार न करता ते रद्द ठरविण्यात येतील. याबाबतच्या निवेदनाचा विचार करण्यात येणार नाही.

६. सदर जाहिरात अर्जाचा नमुना , अर्ज भरण्याची माहिती, परीक्षेचा दिनांक, परिक्षेचे स्वरुप व बैठक व्यवस्था, निकाल तसेच परिक्षेच्या अनुषंगाने आवश्यक असणारी माहिती https://djrpune.maha-info.com/ या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. या माहितीसाठी उमेदवारांनी वेळोवेळी सदरची वेबसाईट पाहावी.

७. माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक कल्याण बोर्डात नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

८. अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव तसेच जातीचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र, अंशकालीन प्रमाणपत्र व इतर अर्हताविषयक प्रमाणपत्रे इत्यादी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे **(मूळ कागदपत्रे जोडू नयेत)**. सदर प्रती केंद्र / राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्टमास्तर, मुख्याध्यापक व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिकाऱ्यांनीच साक्षांकित केलेल्या असाव्यात. तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती असल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारला जाईल.

९. शासकीय / निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने भरावे व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

१०. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक पअक-१००५/प्र.क्र. ३६/०५/१६-अ, दि. २८/३/२००५ नुसार लहान कुटुंब असल्याचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

११. उमेदवारांचे अर्ज सर्व दृष्टीने परिपूर्ण असावेत आणि विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपूर्ण अर्ज फेटाळण्यात येतील.

१२. अर्ज छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवारांची **२०० गुणांची वस्तुनिष्ठ स्वरुपाची लेखी परीक्षा (Objective Type)** घेण्यात येईल. सदर परीक्षा ही पदांसाठी आवश्यक असलेली किमान अर्हता, सामान्यज्ञान व पदासाठी आवश्यक असणाऱ्या ज्ञानावर आधारित राहील. सदर परिक्षेचे केंद्र पुणे येथे राहील.

| पद | लेखी परिक्षा स्तर | इंग्रजी | मराठी | बुद्धिमापन | सामान्य ज्ञान |
|---|---|---|---|---|---|
| कनिष्ठ लिपिक | पदवी | ५० गुण | ५० गुण | ५० गुण | ५० गुण |

१३. उमेदवारांची अंतिम निवड ही लेखी परिक्षेत प्राप्त गुणांचे अनुषंगाने गुणवत्ताक्रमानुसार केली जाईल.

१४. गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या उमेदवारांना मूळ कागदपत्रांची तपासणी करणेकरिता बोलावण्यात येईल. उमेदवारांनी कागदपत्रे तपासणीच्या वेळी मूळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक राहील. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरिता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. छाननीअंती प्रमाणपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास अथवा माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही. मूळ प्रमाणपत्रांची खातरजमा केल्यानंतरच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी रुजू करुन घेण्यात येईल.

१५. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी / नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा नियुक्तीनंतर रद्द करण्यात येईल.

१६. लेखी परीक्षेसाठी / कागदपत्रे तपासणीसाठी उमेदवारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,पुणे विभाग,पुणे कार्यालयाच्या अधिपत्याखालील पुणे आणि सोलापूर जिल्हयांतील कोणत्याही कार्यालयात केली जाईल. नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीचे पालन करणे उमेदवारांस बंधनकारक असेल.

१७. शासन वित्त विभागाचा दिनांक ३१-१०-२००५ नुसार दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर निवड होणा-या उमेदवारांची शासकीय सेवेत नियुक्ती होताच नविन परिभाषीत अशंदान वेतन योजना लागू राहील.

१८. जाहीरातीमध्ये नमुद केलेल्या पदासाठी अंतिम निवडीसाठी निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांना मा. न्यायालयीन आदेश,शासनाचे निर्णय, परिपत्रके,यातील निर्देशाच्या अधिन तसेच वैद्यकीय तपासणी चारित्र्य व पुर्वचारित्र्य इत्यादीच्या अधिन राहुन नियुक्ती दिली जाईल.

१९. पदसंख्येत/आरक्षणात बदल करणे , रद्द करणे, परीक्षा कोणत्याही टप्प्यावर आवश्यकतेनुसार स्थगित करणे, बदल करणे याबाबतचे अधिकार विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,पुणे विभाग,पुणे यांना राहतील, याबाबत कोणताही वाद कोणत्याही न्यायालयात उपस्थित करता येणार नाही.

२०. शासनाने भरतीबाबत/नियुक्तीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय / परिपत्रक / आदेश इत्यादी भरती प्रक्रियेला लागू राहतील.

२१. जाहिरातीच्या अनुषंगाने कार्यवाही न करण्याचे व ती रद्द करण्याचे अधिकार विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,पुणे विभाग,पुणे यांनी राखून ठेवले आहेत.

२२. निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार निवड व नियुक्तीसाठी अपात्र ठरविला जाईल.

**( संगिता डोंगरे )**
विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे विभाग,पुणे